**#MMRDA - #Water To Fast growing vasai Virar in MMR**

**Surya Regional Water Supply Scheme is on the verge of completion.**

**Mumbai, February 01, 2023:**

Surya Regional Water Supply Scheme will address the acute water scarcity issue across the Western sub region of MMR. Water supply will be provided to Vasai-Virar City Municipal Corporation as part of Phase-1 of this project in early 2023 when Testing, Trial Run & Commissioning of the 185 MLD scheme is planned in March 2023.

To provide clean drinking water to citizens, the MMRDA is constructing a 403 MLD water treatment plant. The work on the Intake Structure is 98% done & the work on the Water Treatment Plant is 94% done. A total of 88 kilometers of the pipeline are being laid, as well as tunneling in Mendhwankhind has been completed and work on Tungareshwar tunneling is in full swing. 95% of phase 1 and 82% of the entire project is completed.

**"Surya project is an ambitious project of MMRDA because apart from developing infrastructure MMRDA is conceiving its first Water Supply Project for the Western sub-region of MMR. The Phase-I scheme will provide water to Vasai-Virar Municipal Corporation this year & MMRDA's project gets finished in March. Vasai City has to speed up their internal distribution systems. We are helping them on this too. Phase-II Balance 218 MLD scheme will provide water to Mira Bhayander Municipal Corporation in coming months." Shri S.V.R. Srinivas IAS, Hon. Metropolitan Commissioner, MMRDA(Ends).**

**सूर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्णत्वाच्या मार्गावर.**

**पहिल्या भागाचे काम ९५ टक्के पूर्ण**

**मुंबई, ०१ फेब्रुवारी २०२३:**

सूर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ही मुंबई महानगर प्रदेशाच्या पश्चिम उपप्रदेशातील तीव्र पाणी टंचाई समस्येचे निरसन करून या प्रकल्पातून नागरीकांना शुद्ध, पिण्यायोग्य पाणी पुरवठा होणार आहे. त्यानुसार या प्रकल्पाच्या पहिल्या भागाची चाचणी आणि योजना कार्यान्वित करणे मार्च २०२३ मध्ये नियोजित आहे. पहिल्या भागातून वसई-विरार शहर महानगरपालिकेला १८५ दश लक्ष लिटर क्षमतेने पाणीपुरवठा केला जाईल.

नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी एमएमआरडीए ४०३ दश लक्ष लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारत आहे. या प्रकल्पातील उदंचन केंद्राचे काम ९८% आणि जलशुध्दीकरण केंद्राचे काम ९४% पूरण झाले आहे. प्रकल्पात एकूण ८८ किलोमीटरची पाईपलाईन पसरवली जात आहे, तसेच प्रकल्पात दोन बोगदे असणार आहेत. त्यापैकी मेंढवणखिंड बोगद्याचे काम पूर्ण झाले असून तुंगारेश्वर बोगद्याचे काम जलदगतीने सुरू आहे. प्रकल्पाच्या पहिल्या भागाची ९५% प्रगती झाली आहे तर संपूर्ण प्रकल्प ८२% पूर्ण झाला आहे.

**"सूर्या प्रकल्प हा एमएमआरडीएचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे, कारण पायाभूत सुविधा विकसित करण्यासोबतच एमएमआरडीए मुंबई महानगराच्या पश्चिम उप-प्रदेशासाठी पहिला पाणीपुरवठा प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या भागातून मार्चमध्ये वसई-विरार शहर महानगरपालिकेला पाणी पुरवठा केला जाईल, ज्यासाठी वसई शहराला त्यांच्या अंतर्गत वितरण प्रणालीला गती द्यावी लागणार असून यासाठी एमएमआरडीए त्यांना मदत करत आहे. तसेच दुसऱ्या भागातून २१८ दश लक्ष लिटर इतका पाणीपुरवठा मीरा भाईंदर महानगरपालिकेला येत्या काही महिन्यांत केला जाईल." असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास भा. प्र.से., म्हणाले.**



